Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-4 | Issue- 7 | Jan-2015

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक व आर्थिक चिंतन



**विरेंद्र मुरलीधर घरडे**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख , गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञा-न महाविद्यालय,-न□ाव,धुळे.

**सारांश -**

आधुनिक काळातील चिंतनशिल व प्रयोगशील विचारवंत म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा गौरव केला जातो. दलित वर्गाचे उध्दारक, देशाच्या संविधानाचे निर्माते आणि बुध्द धम्माच्या समता व मानवतावादी आचार विचाराचे पुनरूज्जीवन नव्हे तर जगाला परिचीत असे अत्यंत संवेदनक्षम, धैर्यशील, सहनशिल आणि अभ्यासूवृत्तीमुळे समाजप्रबोधनातील अग्रगण्य विचारवंत म्हणून त्यांचे नाव अभिमानाने घेतले जाते. त्यांना समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी संपूर्ण जीवन अर्पण केले.

## प्रस्तावना-

अथांग इच्छाशक्तीच्या जोरावर शोषण व्यवस्थेची हजारो वर्षाची कमान वाकविली व देशाची दिशा बदलू-न नियोजनाचे द्वार खुले केले. त्यावेळी समाज व्यवस्थेत पेरली गेलेली जातीप्रथा, अस्पृश्यता, भेदभाव, केशवप-न, विधवा पुनर्विवाह, महिला शिक्षण सारख्या सामाजिक समस्यांचे निराकरणाचे मोठे आव्हान होते. या सर्वांचा विकास व क्रांती घडवून आणण्यासाठी त्यांनी राज्यघटनेत स्वतंत्र समता बंधुत्व या मुल्यांचा विचार टाकून न्यायाची संकल्पना मांडली. त्याच बरोबर राज्यसमाजवादाचे क्रांतीवारी विचार मांडून नियोजन व आर्थिक सत्तेच्या विकेंद्रीकरणावरचे समर्थन केले. अशा सामाजिक व आर्थिक क्रांती घडणाऱ्या प्रबोधनकाराच्या विचारांचा आढावा खालील शोध निबंधात केला आहे.

- **उद्देश -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा आहे.

- **गृहितके -**

अ] डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन कार्य करणे उपयुक्त आहे.
ब] मानवाच्या कल्याणासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मोलाचे आहे.
क] सामाजिक आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये परिवर्तन डॉ.बाबासाहेब यांच्या विचारातुन होऊ शकते.

- **महत्त्व -**

भारतात निर्माण झालेल्या सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्यांच्या निराकरणात डॉ.आंबेडकरांच्या विचाराचा उपयोग आधुनिक काळातील राजकीय कार्यकर्त्यांना व प्रशासन तसेच नियोजनकर्त्यांना होऊ शकतो. त्यामुळे डॉ.आंबेडकरांच्या विचारांना महत्त्व प्राप्त होते.

- **संशोधन पध्दती -**

प्रस्तुत लघु शोध निबंधासाठी आशय विश्लेषणाचे तंत्र वापरण्यात आले आहे. त्याचबरोबर ऐतिहासिक नोंदी, संदर्भ ग्रंथ, मासिके, शासकिय अहवाल या दुय्यम साधनांचा अवलंब देखील यात केला आहे.

स्वातंत्र्यपूर्वी सामाजिक सुधारणा अगोदर कि राजकीय सुधारणा अगोदर या विषयावर अनेक वैचारिक मतभेद निर्माण झाले होते. काही सुधारकांना प्रथम सामाजिक सुधारणा हव्या होत्या तर काहींना प्रथम राजकीय सुधारणा हव्या होत्या. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीच्या विकासासाठी सामाजिक व अर्थिक सुधारणेचे समर्थन केले. लोकशाहीत स्वातंत्र्य, समता, न्याय ही तत्वे जोपर्यंत भारतीय जनतेला बहाल होणार नाही तो पर्यंत भारतातील दारिद्र्य, गरीबी, दिनता नष्ट होणार नाही हे आंबेडकरांनी जाणले होते. हा प्रगतीशील व विकसित सामाजिक व आर्थिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेऊनच डॉ.आंबेडकरांनी राज्य समाजवादाचा प्रखर विचार मांडला. या राज्यसमाजवादाची निर्मीती गरीब अल्पसंख्यांक, आदिवासी, मागास जाती जमातीच्या होणाऱ्या सामाजिक व अर्थिक शोषणातून झाली.

१९ नोव्हेंबर १९४८ मध्ये आर्थिक लोकशाही हेच आपले उद्दिष्ट असले पाहिजे हे स्पष्ट करतांना "while we have established political democracy it is also the desire that we could lay down as an ideal economic democracy. The constitution also wishes to lay down an ideal before those who could be forming the government that ideal is economic democracy." [१]

भारताच्या एकंदरीत विपरीत परिस्थितीचा चिकित्सक अभ्यास केल्यानंतर त्यांनी प्रथम जाणले कि, भारतात असणारी वर्ण व्यवस्था हीच शोषणाला कारणीभूत आहे. इतर आर्थिक विचारवंतांचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी प्रथम जाणले की, मार्क्सप्रणीत साम्यवाद जगात फक्त आर्थिक समता निर्माण करू शकतो. परंतु सामान्य जनतेचे स्वातंत्र्य अबाधीत ठेवू शकत नाही म्हणून त्यांनी मार्क्सप्रणीत साम्यवादाचा काही पातळीवर विरोध केला असला तरी डॉ.आंबेडकर म्हणतात "आर्थिक प्रश्नासाठी स्पृश्यापृश्य कामगारांची एकजुट आवश्यक आहे.पण स्पृश्य कामगारांची सामाजिक उच्चतेची भावना या एक्यांच्या आड येते. एवढेच नाव्हे तर आर्थिक - शैक्षणिक दृष्ट्या समान पातळीवर असलेल्या अस्पृश्य श्रमिकाला सामाजिक, आर्थिक अशा क्षेत्रात स्पृश्य समान लेखलच असे नाही."[२] याच पेचातून मार्ग काढण्यासाठी डॉ.आंबेडकरांचे अर्थकारण म्हणजे माणसाचय उन्नजीचे किंवा आर्थिक परिस्थितीचे सर्वसामान्य विवेचन नाही तर ते माणसाला माणसासारखे ज्या ठिकाणी वागविता येईल, पशुप्रमाणे त्यांना वागणूक मिळणार नाही याची दक्षता घेणारे तत्वज्ञान त्यात दडलेले आहे. मजुराला स्वातंत्र्य आणि समता दोहोंची गरज आहे. जी घटना दोघांचे संतुलन करते तीच मजुराच्या दृष्टिने आदर्श घटना आहे. समाजातील जी आर्थिक प्रणाली मजुरवर्गाच्या हिताचे योग्य पध्दतीने रक्षण करते त्यालाच समाजवाद असे म्हणतात. हाच खरा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना प्रत्यक्ष

आचरणात आणावयाचा होतो. डॉ.आंबेडकरांनी जाणले होते की, सामाजिक विषमतेतुन आर्थिक विषमता निर्माण होते. आर्थिक विषमतेमुळे कायद्याने मिळणारी राजकीय समता निरूपयोगी ठरते म्हणून भारतात असणाऱ्या जाती व्यवस्थेसारख्या विषमतेमुळे व्यावसायीक गतिशिलतेला मर्यादा आली असून त्यामुळे राष्ट्राच्या विकासाच्या प्रक्रिया कुंठीत झाली आहे त्यामुळेच मागासवर्गीय समाजाला समता व स्वातंत्र्य देऊन त्यांचा संर्वांगीण विकास करण्याचे व्रत त्यांनी घेतले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रेष्ठ दर्जाचे आर्थिक विचारवंत होते, त्यांनी आपल्या "स्टेट्स ॲण्ड मायनॉरिटीज" या ग्रंथात समाजवादी श्रेष्ठ तत्वे मांडली. ते लिहीतात, राष्ट्रीय दृष्ट्या महत्वपूर्ण असलेले मुलभूत उद्योग हे राज्याच्या मालकीचे असायला पाहिजे व त्याचे संचलन राज्यानेच करावे, जे उद्योग पायाभूत आहेत त्यावरही राज्याचे नियंत्रण असावे किंवा राज्याद्वारे निर्मीत महामंडळाकडून चालविले जावे, वेतनाच्या समप्रमाणात सक्तीचा विमा काढून आयुर्विमेचे सरकारीकरण करावे, शेती हा राष्ट्रीय उद्योग असावा व शेतीचे सामुहीकीकरण करावे, शेतीला लागणारी जनावरे, पाणी, खतबियाणे ही राज्यसरकारने शेतकऱ्यांना पुरवावीत, जमीनीचे वाटप जाती-धर्मावर करू नये, जमिनिचे वितरण करतांना कुणीही शेतमजुर व कुळ राहणार नाही याची खबरदारी व्हावी, त्यांनी कर्जरोख्याचे समर्थन केले राज्य हे उद्योग वित्त आणि शेती योग्य भूमीला त्यांच्या मालकाकडुन चालू निर्धारित भावाने मुदतीच्या कर्ज रोख्याच्या स्वरूपात सरकार विकत घेऊन त्यांचा विकास करेल. थोडक्यात आर्थिक क्षेत्राच्या विकेंद्रिकरणाचा आराखडा तयार करून आर्थिक सत्ता सर्वसाधारण जनतेच्या हातात कशी एकवटली जाईल याचे प्रखर चिंतन त्यांनी केले.

डॉ.आंबेडकरांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, समानतेबरोबरच राजकीय क्षेत्रातील समतेला महत्त्वपूर्ण मानले होते. "आम्ही एक एक मत प्रत्येक मतांचे समान मूल्य स्विकारले असले तरी देखील भारत देशात जोपर्यंत सामाजिक तसेच आर्थिक क्षेत्रात समता प्रस्थापित होत नाही तोपर्यंत देशातील राजकीय सत्ता संपत्तीधारक वर्गाकडेच केंद्रित होणार त्याचा परीणाम सत्ता व संपत्ती एकाच वर्गाकडे गेल्यामुळे सामाजिक जीवनावर दुषपरिणाम होतील अन्याय व अत्याचारात वाढ होईल. त्या सर्वांचा बळी भारतीय समाजव्यवस्थेत संपत्ती व सामाजिक दर्जा या दोन्ही गोष्टी नाकारलेला दलीत वर्गच ठरेल."[३]

डॉ.आंबेडकर हे श्रेष्ठ दर्जाचे समाजप्रबोधनकार असल्यामुळे त्यांचा समाज परिवर्तनाचा दृष्टीकोन हा संकुचित स्वरूपाचा नसून भारतात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा विकास त्यांचा दर्जा व संधीनुसार व्हावा असे त्यांना वाटे म्हणून ते म्हणतात, "The purchase of education is to socialize and to moralize"[४] पुढे ते म्हणतात, "ज्यांच्या सहाय्याने रक्तपाताशिवाय लोकांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणता येतो त्याच व्यवस्थेत खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडवून आणता येते व लोकांना स्वातंत्र्याचा उपयोग घेणे शक्य होते."[५] प्रबोधनाचे मार्ग शिक्षणातुन मोकळे होत असले तरी शिक्षणाच्या माध्यमातुन केवळ कामगार, नोकरदार निर्माण व्हावे एवढाच उद्देश त्यांचा नव्हता त्याद्वारे सामाजिक आणि नैतिक क्रांतीची बीजे पेरली जावी असे त्यांना वाटे. आणि त्यातुनच क्रांतीकारी राष्ट्रवादाची निर्मीती व्हावी असे त्यांना वाटे. आपल्या प्रखर राष्ट्रवादाचे समर्थन करतांना डॉ.आंबेडकर म्हणतात, "I do not like what some people say that we are Indian first and Hindus after words or Muslims after word. I am not satisfied with that. I friendly say that I am not satisfied with that I do not want that our loyalty as Indians shown be in the slightest way effected by any competitive loyalty whether that loyalty arises out of our religion, out of our oulture or out of our language I want all the people to be Indian first, Indian last and nothing else."[६]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर 'राजकीय लोकशाहीचे' समर्थक होते. राजकीय लोकशाहीतून सर्वसामान्य जनतेचा सहभाग सरकारमध्ये वाढावा असे त्यांना वाटे. सामाजिक विकासासाठी लोकशाही समाजाभिमुख करून समाजकल्याण साधण्याचा उदात्त हेतू त्यांचा होता. लोकशाही समाजव्यवस्था निर्माण व्हावी व त्यातुन मुलभूत अधिकार व हक्काचे समर्थन करून सामाजिक सुरक्षा निर्माण व्हावी असे त्यांना वाटे यासाठी त्यांनी देशात समता निर्माण करण्याचे आवाहन

□ले त्याचे बरोबर लोकशाहीच्या विकासासाठी शांती आणि अहिंसेच्या मार्गाचा पुरस्कार करतात ते म्हणतात "my definition of democracy is a form and method of government where by revolutionary changes in the economic and social life of the people are brought about without bloodshed. If democracy can enable those who are running it to bring about fundamental changes in the social and economic life of the people and the people accept those changes without resorting to bloodshed then I say that there is democracy."[७]

निस□ी-ने दिलेल्या समतेचा पुरस्कार जोपर्यंत शासनव्यवस्था करणार नाही तो पर्यंत आदिवासी दलीत समाजाच्या मुलभूत हक्काचे संरक्षण होणार नाही म्हणून त्यांनी राज्यघटनेच्या सारनाम्यात समतावादी तत्वाचा पुरस्कार केला. ते म्हणताता, "I must here emphasis that this country is composed of different communities. All these communities are unequal in their states and progress If they are to be brought to the level of equality then the only remedy is to adopt the principle of inequality and to give favoured treatment to those who are below the level."[८]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे धर्मिक प्रबोधनातून  समाजप्रबोधन करण्यात इच्छूक होते. बौध्द धर्माचे तत्वज्ञा-ा जगातील दु:ख, दारिद्र्य आणि समस्या सोडवू शकतो हे त्यांनी जाणले म्हणून त्यांनी बौध्द धर्माचा स्विकार करून 'धर्मनिरपेक्षतेचे' समर्थन केले. बैध्द धर्माचा सखोल अभ्यास केल्यानंतर आणि बुध्दाच्या धम्मावर शरण जाण्याची पू□ मानसिकता तयार झाल्यानंतर बुध्दाच्या प्रती आपल्या संवेदना स्पष्ट करतांना ते म्हणतात, "I consider lord Buddha as leader who without fear and favor tells the people what is good and what is bad for them. It is my duty to tell you that is Buddha dhamma sympathy, equality and liberty you will get easily there is no binding or restrictions for economic or social progress to untouchables which is not possible at all in Hindu religion."[९]

भारतीय संसदेत हिंदू कोड बिलावरील चर्चेत डॉ.आंबेडकरांनी धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना अगदी सुस्पष्ट शब्दात मांडली ते म्हणतात, "आम्ही लोकांच्या धार्मिक भावना विचारात घेणार नाही असा धर्मनिरपेक्ष शब्दाचा अर्थ नाही. धर्मनिरपेक्ष राज्याचा अर्थ असा की, संसद कोणावरही कोणताही धर्म लादणार नाही. आपली घटना फक्त हेच मान्य करते."[१०] बैध्द धर्मातील 'धम्म' याचे महत्त्व सांगतांना डॉ.आंबेडकर म्हणतात, "धम्म हा मुलत: व तत्त्वत: सामाजिक आहे, जीवनातील सर्व क्षेत्रात माणसामाणसामधील व्यवहार उचित असणे यासाठी धम्माची आवश्यकता असल्याचे बाबासाहेब प्रतिपादन करतात. स्वतंत्र्य, प्रज्ञा (निर्मळ बुध्दी) आणि करूणा (प्रेम) याद्वारे सामाजिक लोकशाहीची प्रस्थापना करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेचे आविष्करण केवळ बुध्द तत्वज्ञानाद्वारेच शक्य आहे. भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेचा हाच विचार संदर्भीत आहे. धर्म शासनाचा होऊ शकत नाही, परंतू धम्म हे तर शासनाच्या साधनाहून वेगळे राहूच शकत नाही."[११]

आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या सामाजिक व आर्थिक विचारांची गरज आहे. वर्णव्यवस्था -ाष्ट झाल्यानंतर आपल्या देशाचा खरा विकास होईल हे भाकित खरे ठरत आहे. त्यांनी सुचविलेली नैतिक मुल्ये व मार्गदर्शक तत्त्वाचा सरकारने जर योग्य रित्या लागू केल्या तर आर्थिक मंदि, वाढत्या लोकसंख्येमुळे निर्मा□ हो□ारे सामाजिक व आर्थिक प्रश्न, शेतीव्यवसायाचे खच्चीकरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, लघुकुटीर उद्योगाचा हो□ारा -ाश, रूपयाचे अवमुल्यन, आंतरराष्ट्रीय संबंधीत तणाव, परराष्ट्रीय उद्योगांमुळे भारतीय उद्योगांवर होणारे विपरीत परिणाम इ. सारख्या समस्येवर वेळेवरच नियंत्रण घालता येते. डॉ.आंबेडकरांना मार्क्सचा क्रांती सिध्दांत व त्याची साधने मान्य नव्हती कारण त्यांच्या विचारणीचा आधार "नैतिकता" होता. लोकशाहीतील सामाजिक व आर्थिक विचाराचा पाया सत्य व अहिंसेवर उभा होता. भारतीय समाजात कोणीही श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-निच्च, गरीब श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य राहणार नाही अशा आदर्श समाज रचनेचे स्वप्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पाहत असल्यामुळे हुकुमशाही व्यवस्था परवडणार नाही अशी ठाम भुमिका त्यांची होती. म्हणून १७ सप्टेंबर १९४६ च्या घटना समितीच्या बैठकीत डॉ.बाबासाहेब

आंबेडकर म्हणतात, देशात सामाजिक व आर्थिक न्यायासाठी उद्योग व जमिनीचे राष्ट्रीयकरण केले पाहिजे. इतकेच नव्हे तर अन्याय मुक्त समाजाची निर्मीती होण्यासाठी भारतीय ग्रामीण रचनेत बदल व स्वतंत्र वसाहतीच्या निर्मितीचा मार्ग सुचवितात. आज आपण जगातील सर्वश्रेष्ठ शासनप्रणाली 'लोकशाही' व्यवस्था स्विकारली आहे परंतू सद्यपरिस्थितीत लोकशाहीच्या नितीमुल्यांची जी अधोगती व भाकरीचे तुकडे गमाविलेल्या लोकांचा आवाज जो ऐकु येत आहे ते पाहून डॉ.आंबेडकरांनी सांगितलेले विचार व सावधगिरीचा इशारा आम्हा भारतीय जनतेला दिपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरेल अशी अपेक्षा करणे काळाची गरज नव्हे काय?

**• निष्कर्ष -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चिंतनातून असा निष्कर्ष निघतो की, त्यांनी केलेले विवेचन तर्कशुध्द आणि विज्ञान निष्ठ आहे. त्यांनी मांडलेल्या सामाजिक व आर्थिक विचारातुन देशासमोर असलेल्य सामाजिक, आर्थिक समस्या, बेकारी, दारिद्र्य इ. समस्या सुटू शकतात, म्हणून देशाच्या सामाजिक व आर्थिक नियोजन व धोरणात त्यांच्या विचारांना कृती कार्यक्रमात सामावून घेणे अत्यावश्यक ठरते. त्याचबरोबर संघटनेच्या कुशल नेतृत्वाअभावी दलीतांचे राजकारण दिशाहीन झाले त्यावर नियंत्रण करणे देखील सुलभ ठरू शकते म्हणून सामाजिक हित व राष्ट्रीय कल्याण साधण्यासाठी डॉ.आंबेडकरांचे विचार श्रेष्ठ आहेतच हे नाकरता येत नाही.

**• संदर्भ -**

१. कॉन्स्टीट्युशन असेंबली डिबेट - vol-७. पुष्ठ-४९४. Date १४/११/१९४८.
२. देशपांडे म.द. - 'डॉ.आंबेडकर यांचे राजकीय विचार' लोकवाड्मय गृह.मुंबई आवृत्ती-II, मार्च १९९८ पान २५.
३. शिंदे ज.रा. - 'भारतीय राजकीय विचारवंत', कैलास प्रकाशन, औरंगाबाद, पान नं.२८.
४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर - एक शिक्षणतज्ञ - ताराचंद्र खांडेकर, सा.जयभीम विशेषांक - २६/मे - १५ जुन २००२.
५. प्रा.देवरे, प्रा.विसपुते, प्रा.निकुंभ, प्रा.शुभदा ठाकरे - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन,पुणे, आवृत्ती - I, २००४ पान नं.१८०.
६. Dr.Babasageb Ambedkar, writing and speeches, vol.-२ complied and editer by vasant moon- p.no.१९५.
७. 'Dalit society and the challenge of development' - edited by om prakash sargwan, common wealth publication - New Dhelhi - edi - I , १९९६ page no. २५.
८. Dr.Babasaheb Ambedker, writing and speeches. Vol.-२, complied and editer by vasant moon page. ४२.
९. बागुल योगीराज - 'आठवणीतले बाबासाहेब', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई आवृत्ती-I, प्रकाशन पृ.३९०, पान नं.३१०.
१०. धनराज डहाट - "डॉ.आंबेडकर अल्पसंख्यांक आणि धर्मनिरपेक्षता", संकेत प्रकाशन, नागपूर, आवृत्ती-I, १९९२, पान नं.३.
११. उपरोक्त पान नं.८



**विरेंद्र मुरलीधर घरडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख ,गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,नगाव,धुळे.